MHSO130002642026

नियमित दिवाणी दावा क्र.२३२/२०२६
उत्तम सातपुते वगैरे
वि.
दादासाहेब सातपुते वगैरे.

## निशाणी क्र.२० वर आदेश

०१] वादीने प्रस्तुतचा अर्ज हा वादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्जावर म्हणणे येईपावेतो जैसे थे परिस्थिती ठेवण्यासाठी विनंती करण्याबाबत दाखल केला आहे.

०२] वादी यांच्या कथनानुसार, दावा मिळकत क्र.१अ व १ब चे क्षेत्र विभागणी होत असताना दावा कलम क्र.१ब वर्णनातील क्षेत्रास सामाईक विहीर क्षेत्र, देवस्थान म्हणुन सर्व्हे नं.८५/४ (म्हणजेच हल्लीचा गट नं.२१२ असे ०.५ आर ) असे स्वतंत्र सामाईक विहीर क्षेत्र मयत सोमा मारुती सातपुते, मयत कृष्णा महादेव सातपुते, मयत गहिणीनाथ रंगनाथ काशीद यांच्या नावाने ७/१२ व फेरफार देखील १/३ हिश्शाचे तयार झाले. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या वहिवाटी वारसा हक्काने आजपावेतो आहेत. सन १९६२ मध्ये स्वतंत्र विहीर निर्माण करुन सदर विहीरीवर पाण्याची सोय करुन देवदेवतांची पुजा अर्चा देखील सदर विहीरीवर करण्यासाठी रस्त्याचा वापर चालु आहे. प्रस्तुतच्या रस्त्याशिवाय वादी व प्रतिवादी यांना पर्यायी रस्ता आजपावेतो उपलब्ध नाही. तसेच वाद रस्ता खुला असल्याने तहसीलदार, बार्शी यांनी व प्रतिवादी क्र.३,४,५,६ यांनी देखील मान्य केले आहे.

०३] वरील सर्व परिस्थिती असताना प्रतिवादी हे विनाकारण वादीचा खुला रस्ता बंद करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरुध्द दिनांक १६/०४/२०२६ रोजी पोलीस उपअधिक्षक, बार्शी यांच्याकडे तक्रार नोंदविलेली आहे. मात्र प्रतिवादी वारंवार रस्ता नष्ट करण्याची भाषा बोलवुन दाखवित आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ याच्या दाव्याचा व तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे कामी म्हणणे देऊन तुर्तातुर्त अर्ज चालवे पर्यंत दाव्याचा विषय नष्ट होण्याची शक्यता आहे. तसेच दिनांक ०८/०५/२०२६ नंतर दिवाणी कोर्टाला उन्हाळी सुट्टी देखील आहे. त्यामुळे दिवाणी कोर्ट बंद कालावधीमध्ये वादी सदरील रस्ता नष्ट करण्याची दाट शक्यता असल्याने जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी मागणी करीत आहे.

**०४]** प्रतिवादी क्र.३, ४, ५ व ६ यांनी त्यांचे म्हणणे अर्जावर दाखल केले. त्यांना प्रकरणामध्ये जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत कोणतीही अडचण नसल्याचे कथन करुन योग्य त्या आदेशाची मागणी केली आहे.

**०५]** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतच्या अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी क्र.३२ वर दाखल करुन अर्जास तीव्र विरोध करुन अर्ज रद्द करण्याबाबत कथन केले आहे. त्यांच्या कथनानुसार वादीचा दावा प्रस्तुतच्या न्यायालयामध्ये चालविण्यास पात्र नाही व वादी हे कोर्टापासुन काही बाबी लपवुन खोटया मजकुराचा दावा त्यांनी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आर.टी.एस. अपील क्र.३१३/२०१८ हे मा.उप विभागीय अधिकारी, सोलापूर क्र.१ यांच्या समोर दाखल केलेले असुन त्याकामी दिनांक २१/०२/२०१८ रोजी दिवाणी न्यायालयाच्या दाव्यास अधीन राहुन निकाल दिलेला आहे. सदरील बाब वादीने न्यायालयापासुन लपवुन ठेवलेली आहे. तहसीलदार यांच्या निकालाविरुध्द न्यायालयामध्ये रेमंन. ६७/२०१९ हा दावा वादीविरुध्द दाखल केलेला आहे. सदरील दावा प्रलंबित असुन वादीने हेतुपुरस्सरपणे दाव्यामध्ये त्याचा उल्लेख केलेला नाही. वादीचा दावा काल्पनिक व अवांतर हेतु साध्य करण्यासाठी केलेला आहे.

**०६]** यातील वादींना गट नं.२११ चे पश्चिमेस असलेल्या दहिटणे-ढोराळे या डांबरी रस्त्याने उत्तर बाजुस गट नं.२११ च्या उत्तरेकडील बांधाने जाणेयेणेसाठी गट नं.२१४/१ मध्ये रस्ता होता व आहे. तसेच गट नं.२१४/१ मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांची पेरुची झाडे व ऊस पिक, पाण्याचे टी कॉक हे गट नं.२१४ च्या पश्चिम बाजुस होते व आहे. त्याचे नुकसान व्हावे या गैरहेतुने वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. यातील प्रतिवादी यांना गट नं.२११ च्या पश्चिम बाजुने गट नं.२१३ मध्ये जाण्यासाठी सोयीस्कर रस्ता होता व आहे. वादीने याबाबी न्यायालयापासुन खोडसाळपणाने लपवुन ठेवलेल्या आहेत. सबब, वादीचा अर्ज रद्द करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०७]** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी निशाणी क्र.४, ८, १० खाली दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले तसेच प्रतिवादींनी निशाणी क्र.३५ वर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०८]** वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा जाहिरीकरणासाठी व निरंतर मनाई

हुकूमासाठी दाखल केलेला असुन तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्जही त्यांनी निशाणी क्र.५ खाली दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी हे वादींचा खुला रस्ता बंद करण्याची दाट शक्यता त्यांना वाटत असल्याने तसेच प्रतिवादींनी वारंवार रस्ता नष्ट करण्याची भाषा बोलवुन दाखविलेली असल्याने व त्यांना वादातीत रस्ता नष्ट होण्याची शक्यता वाटत असल्याने सदरील रस्त्याची 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबत त्यांनी मागणी केलेली आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादातीत रस्त्याबाबत दिवाणी न्यायालयामध्ये दावा प्रलंबित आहे व वादी यांनी त्याबाबत प्रस्तुतच्या दाव्यामध्ये कोठेही उल्लेख केलेला नाही. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा भविष्यामध्ये निर्माण होणा-या शक्यतांच्या आधारावर दिल्याचे दिसुन येत आहे व सदरील शक्यतांवर भिस्त ठेऊन ते प्रस्तुतच्या अर्जाद्वारे मागणी करीत आहेत. प्रतिवादी यांनी वादीने कथन केल्याप्रमाणे वादातीत रस्ता बंद करण्याची दाट शक्यता त्यांना वाटत आहे व त्याबाबत प्रतिवादी यांनी रस्ता नष्ट करण्याची भाषा बोलुन दाखविलेली आहे असे त्यांचे कथन आहे. परंतु प्रतिवादी यांनी त्याबाबत कोणते कृत्य केले याबाबतचा पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणलेला नाही. दावा दाखल केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यासाठी कोणत्या नवीन बाबी उध्दभवल्या याबाबतही वादीचे कोणतेही कथन नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे निशाणी क्र.५ च्या अर्जावर चौकशीसाठी प्रलंबित आहे. असे असताना प्रकरणामध्ये कोणतीही तातडीची बाब निर्माण झाल्याचे दिसुन येत नाही. वादी कथन करत असलेल्या शक्यतांच्या आधारावर व प्रकरणामध्ये कोणतेही तातडीची बाब दिसुन येत नसल्याने वादीचा अर्ज मंजुर करणे योग्य होणार नाही. अशा सर्व परिस्थितीमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## **<u>आदेश</u>**

१. वादींचा अर्ज (निशाणी क्र.२०) नामंजुर करण्यात येत आहे.

PADMASHRI VASANT RAUT

Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2026.05.08 17:39:29 +0530

बार्शी.
दिनांक ०८/०५/२०२६

**( श्रीमती पी.व्ही. राऊत )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बार्शी.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule,<br>Stenographer Grade-III |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>Jt.C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 08/05/2026 |
| (d) | Judgment /Order checked on | : | 08/05/2026 |
| (e) | Judgment /Order signed by P.O. on | : | 08/05/2026 |
| (f) | Judgment /Order uploaded on | : | 08/05/2026 |